**मा. जिल्हाधिकारी , चंद्रपूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६.६.२००९ रोजी दुपारी ३.३० वाजता आयोजित जिल्हा उद्योग मित्र सभेत चर्चा करण्यांत आलेले इतिवृत्त**

| अ. क्र. | संस्था /कार्यालय | विषय | संबंधित कार्यालय | सद्यस्थिती /मागील सभेतील निर्णय | सभेतील निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अध्यक्ष, एमआयडीसी इंडस्ट्रीज असो. | ईरई नदी ते एमआयडीसी पर्यंत पथ दिवाबत्तीची सोय करण्याबाबत | एमआयडीसी चंद्रपूर / म्हाडा चंद्रपूर / जिल्हा परिषद, चंद्रपूर | **मागील सभेतील निर्णय -**<br>मऔविमं यांनी त्वरीत १०० खांब उभारण्यासाठी रु १० लाख प्रत्येकी खर्च करुन उभारण्याच्या कामास सभेत मान्य केल्यानुसार सुरवात करावी व दोन्ही संस्थानी त्यांनी उभारलेल्या खांब व पथदिव्याचे उभारणीचे पश्चात मा. जिल्हाधिकारी यांचे स्वाक्षरीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिष्द यांना ग्रामपंचायत मार्फत १४० खांब व पथदिव्याची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत अ. शा. पत्र द्यावे असे ठरले.<br>याबाबत जिल्हा परिषद, चंद्रपूर तसेच म्हाडाच्या अधिका-यांना सभेत बालविण्यात यावे असे ठरले. | कार्यकारी अभियंता म्हाडा, नागपूर यांनी सांगितले की म्हाडा हि त्यांचे कॉलनी बाहेर कोणताही खर्च करिता नाही. त्यामुळे मा.अध्यक्षंनी सदर विषय बंद करुन, सोलर दिवे बसविण्याबाबत एम ई डी ए , पूणे यांना कळविण्याचे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. |
| २ | ताडाळी येथील स्टील उद्योग /अध्यक्ष, एमआयडीसी इंडस्ट्रीज असो. | ताडाळी येथील विद्युत पुरवठ्याबाबत तसेच अन्य मूलभुत सुविधाबाबत | कार्यकारी अभियंता, एमएसईबी | **मागील सभेतील निर्णय -**<br>उप अभियंता मऔविमं नुसार ५ कि मी च्या रस्ता बांधकामा पैकी ४ कि मी च्या रस्ता बांधकामावर १६९ लाख खर्च झाला असून उर्वरीत १ कि मी रस्ताचे बांधकामाचा रु ४० लाखचा निधी कंत्राटदार काम सोडून गेल्यामुळे अखचीत असल्याचे सभेत सांगितले. उरलेल्या १ कि मी चे काम नविन निवीदा काढून तीन महिण्यात संपुष्टा त आणावे असा निर्णय झाला. उपरोक्त रस्त्याचे डाव्या बाजूने जड वाहतूकीचसाठी Concrete Road बांधण्याचे बी एण्ड सी विभागाचे मैनकां नुसार वागण्याचे ठरले असून भूखंडधारकांना देण्यात येणा-या सेवाशुल्कामध्ये रु १ ची वाढ करुन मऔविमं Concrete Road बांधणार असल्याचे उपअभियंता मऔविमंने सभेत सांगितले. मराविविकं ने सभेत सांगितले की २२० केव्ही सबस्टेशन साठी भूखंड ताब्यात असून अद्याप ३३ केव्ही | ताडाळी ओद्योगिक वसाहतीमधील रोडचे काम जून २००९ अखेर पूर्ण होईल असे उप अभियंता एमआयडीसी नागपूर यांनी सांगितले. तसेच २२० `व्ही च्या सबस्टेशन करिता मुख्य अभियंता म रा विज परिषण कंपनी यांना मा अध्यक्षाचे सहीने अर्धशासकीय पत्र देण्यांचे निर्देश दिले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | साठी**च्या सबस्टेशनसाठी भूखंउाचा अर्ज मराविविकंने केलेला** असून विभागीय अधिका-या मार्फत मऔविमं मुख्यालयास पाठविला आहे. भूखंड ताब्यात आल्यावर ३ महिन्यात पथ दिव्याची उभारणी करावा असा सभेत निर्णय झाला.<br>**३३ के.व्ही. सबस्टेशन उभारणीचे टेंडर काढण्यात आलेले आहे. परंतु कोणीही अद्याप संपर्क साधला नसल्यामुळे पुढील सभेत मुख्य अभियंता म रा विज परिषण कं. मर्या. यांना सभेत बोलविण्यात यावे असे अध्यक्षांनी निर्देश दिले** | |
| ३ | अध्यक्ष एमआयडीसी इंडस्टीज असो. | चंद्रपूर येथे उद्योग भवनाचे बांधकाम | कार्यकारी अभियंता एमआयडीसी, नागपूर | **<u>सद्यस्थिती</u>** -<br>मऔविमंने एम आय टी नागपूर कडे पाठविलेल्या उद्योग भवनाचे Design व Drawing ला सात दिवसाचे आत पाठपुरावा करुन मंजूरी घेवून बांधकामाच्या तयार असलेल्या निवीदा एका महिन्याचे आत प्रसिध्द कराव्या असा निर्णय सभेत झाला.<br>टेंडर काढण्यात आलेले असून टेंडर कोणीही भरले नसल्यामुळे आचार संहिता संपल्यानंतर टेंडर काढण्यात येईल असे उप अभियंता म औ वि मं यांनी सभेत सांगितले. त्वरीत कार्यवाही करण्यांत यावी असे निर्देश दिले. | निविदा दिनांक १८-६-२००९ ला उघडल्या नंतर सदर्हू काम दोन वर्षात करारनाम्यानुसार पूर्ण करण्याबाबतची खात्री करावी. असे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. |
| ४. | अध्यक्ष , एमआयडीसी इंडस्ट्रीज असो. | चंद्रपूर फ्लाय ॲश क्लस्टर विकासाबाबत सद्यस्थिती | एमआयडीसी | **<u>सद्यस्थिती</u>** -<br>अध्यक्ष एमआयडीसी इंडस्ट्रीज असोशिएशन यांनी सांगितले की एसपीव्ही ची खाजगी कंपनी म्हणून नोंदणी झाली असुन अद्याप नोंदणी क्रमांक अप्राप्त आहे. डीपीआर बनविण्याचे काम MITCON कडे प्रगतीपथावर असल्याचे सांगितले. TARA या NGOने जिल्ह्यातील फ्लॉय ॲशवर आधारीत उद्योजकांसाठी दिनांक २०-२-२००९ ला हॉटेल सिध्दार्थ, चंद्रपूर येथील कार्यशाळेत | मागील सभेतील निर्णयानुसार फ्लाय ॲश क्लस्टर चे सभासद दिनांक २०/२२००९ ला कार्यशाळत हजर होते.<br>असे सभेत सांगितले असता MITCON कडून डिपीआर लवकरांत लवकर करावा असे मा. अध्यक्षांनी निर्देश दिलेत.. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | एसपीव्हीच्या सभासदांनी यावे असे जाहीर आमंत्रण TARA चे उपस्थित प्रतिनिधीनी केले.<br>सदर्हू एसपीव्ही ने तीन अतिरिक्त आस्थित्वातील Fly Ash Bricks Mfg. घटकास एसपीव्ही मध्ये संचालक म्हणुन ध्यावे व संचालकांसह इतर सर्व किमान ५० सदस्यांनी सदर्हू क्लस्टर मध्ये भूखंड घेण्याकरिता इएम १ ची नांदणी घ्यावी व एसपीव्ही ने लवकरात लवकर डीपीआर तयार करावा असे सभेत ठरले. | |
| ५ | डिस्ट्रीक्ट इंड असो., चंद्रपूर | वेकोफिचा भूमीगत रिकाम्या खाणी मध्ये बाटम ॲशने भरण्याबाबत | वेकोफि चंद्रपूर | सद्यस्थिती -<br>वेकोफि ने रिकाम्या भूमीगत खाणी भरण्याचा जो प्रस्ताव CMPDI धनबाद येथे मंजूरी साठी पाठवीला आहे त्यास पाठपुरावा करुन एका महिण्याचे आत मंजूरी घेउन काम सुरु करावे तदनंतरच रेती वाटपाची परवानगी रद्द करण्याचा निर्णय डीएमओ District Mining Office, जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत घेण्यात येईल भूमीगत खाणी रेती ऐवजी बॉटम ॲशनी भरावा असे सभेत ठरले. | वे को फि लि. यांनी त्वरीत CMPDI , धनबाद येथे पाठपूरावा करुन मंजूरी प्राप्त करावी असे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. |
| ६ | | चंद्रपूर जिल्ह्याला औद्योगिक जिल्ह्या घोषित करण्याबाबत | | **सद्यस्थिती** -<br>औरंगाबाद जिल्ह्याचे धरतीवर चंद्रपूर इंडस्ट्रीज असोशिएशन, चंद्रपूर यांनी अहवाल प्रस्तावासहीत १५ दिवसात जिल्हा प्रशासनास सादर करावा असा निर्णय झाला. संघटनेने प्रस्ताव सादर न केल्यामुळे मागील सभेतील निर्णय कायम ठेवण्यात आला. | मा. अध्यक्ष यांचे सहीने मुख्यालयास प्रस्ताव पाठवावा असे ठरले. |
| ७ | डिस्ट्क्ट इंड असो. चंद्रपूर | एमएसएसआयडीसी मार्फत पात्र लघु उद्योगास वाजवी दराने कोळसा सुलभपणे उपलब्ध करुन देण्याबाबत | एमएसएसआयडीसी चंद्रपूर | **सद्यस्थिती -** या बाबत एमएसएसआयडीसीचे व्यवस्थापकीय संचालक, यांना लेखी पत्र जिल्हा व्यवस्थापक, एमएसएसआयडीसी यांनी पाठवावे व १५ दिवसात लेखी निवेदन आला. एमएसएसआयडीसीचे प्रतिनिधी हजर नसल्यामुळे विषय पुढी असे ठरले. | सदर विषय विषयसूची वरुन वगळण्यांचे ठरले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | डिस्ट्क्ट इंड असो. चंद्रपूर | जिल्ह्यातील मोठे उद्योगानी स्थानिक लघु उद्योजकांना त्याचें विकासासाठी पूरक उद्योग विकासाद्वारे लाभ देण्याबाबत. | | **सद्यस्थिती -** जिल्ह्यात कार्यरत असणा-या सर्व अस्त्विातील नीवन सिमेंट उत्पादक कं., WCL, CSTPS, MEL, Ordanace Factory Govt. undertaking यांनी दिनोंक २८/५/२००९ पर्यंत त्यांचे व्यवस्थापनास वर्षभर लागणा-या सामानांची यादी जिल्हा उद्योग केंद्राकडे व औद्योगिक संघटनांना पाठवावी असा निर्णय सभेत घेण्यात आला. | दिनांक २२/६/२००७ ला Vender Development बाबत सभेचे आयोजन करण्यांत आलेले आहे. तेव्हा सदर विषय या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यात यावा असे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. |
| ९ | मे सत्यम टायर इंडस्ट्रीज एमआयडीसी चिमूर | चिमूर क्षेत्रात मिळणा-या अनियमीत विद्युत पुरवठा | कार्यकारी अभियंता मराविवकं चंद्रपूर | **सद्यस्थिती -** मंगळवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार सकाळी ११ ते ६ वाजेपर्यंत तसेच शनिवार, , रविवार, सोमवार रात्री ३ ते ११ पर्यंत भारनियमन नियमीत असल्यामुळे उत्पादन प्रक्रिया खंडीत होउुन उद्योग आजारी होण्याचे लक्षणे उद्भवत असल्यामुळे कार्यकारी अभियंता मराविविकं. व मऔविमं यांनी एक्सप्रेस फीडर बाबतच्या प्रगती बाबतची सद्यस्थिती सभेत लेखी अवगत करावी असे ठरले. | मराविविकं ने सदहू घटकाच्या परिस्थिती तसेच काय करता येवू शकेल याबाबत अवगत करावे. असे निर्देश मा अध्यक्षांनी दिले. |
| १० | चांदा इंड. औद्योगिक सहकारी वसाहसत चंद्रपूर | अ) बंगाली कॅम्प ते मच्छीनाला पर्यंत येणा-या मुख्य रस्त्या वरील डावी कडील नाल्याची रुंदी वाढविण्या बाबत<br>ब) वसाहतीतील मूलभुत सोई व सुविधाकडे विशेंष लक्ष देण्याबाबत | मुख्याधिकारी नगर परिषद, चंद्रपूर | **सद्यस्थिती -**<br>अ) बी एण्ड सी डिव्हीजन १ व २ मूल रोडच्या देखभाल व दुरुस्तीचे कामाबाबत कार्यवाही करावी व अहवाल जिउके कडे अद्याप केला नसल्यामु ळे करावा.<br>ब) नगर परिषदने डीपीडीसी कडे सादर केलेल्या ६० लाखाचे् प्रस्तावाचे मंजूरी पश्चात सदहू काम त्वरीत हातात घेवून पावसाळा अग्रोदर संपूर्ण होईल त बघावे व अनुपालन अहवाल जिउकेस पाठवावा असे ठरेले. | सदर विषयाबाबत मुयख्याधिकारी,नगर परिषद, चंद्रपूर यांनी त्वरीत कार्यवाही करावी असे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. |
| ११ | मे चव्हाण पल्वरायझर | पंतप्रधान रोजगार निर्मीती कार्यक्रमा अंतर्गत कर्ज मागणी अर्ज | खादी ग्रामोद्योग आयोग, चंद्रपूर. | **सद्यस्थिती -**<br>सदहू घटकाचे मालकास वित्तीय संस्थेकडून सदहू भंखंडा वरील अगोदरच्या घटकाची मालमत्ता हस्तांतरण करुन घेवून यावर पंतप्रधान रोजगार निर्मीती कार्यक्रमा अंतर्गत नव्याने घटक टाकावयाचा आहे.<br>**मागील सभेतील निर्णय -** | सदर विषय सूचीवरुन वगळण्यात यावा असे मा अध्यक्षांनी निर्देश दिलेत. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | केव्हीआयसी, नागपूर यांचेकडून माहिती अप्राप्त. पाठपुरावा सुरु आहे. | |
| १२ | अध्यक्ष एमआडीसी इंडस्ट्रीज असो. | वरोरा एमआयडीसी मध्ये वापर करण्यात आलेल्या भूखंड धारकांच्या ताब्यात भूखंड देण्याबाबत येणारी अडचण | क्षेत्र व्यवस्थापक, एमआयडीसी, एसडीओ, डीएसपी | **सद्यस्थिती -**<br>७/१२ एमआयडीसी च्या नावाने आहे . क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम यांनी पुढाकार घेवून भूखंड धारकास ताबा देण्याची कार्यवाही करावी. आवश्यकते नुसार उपविभागीय अधिकारी व पोलीस विभागाची मदत घ्यावी. असे निर्देश अध्यक्ष महोदयांनी दिले. | क्षेत्र व्यवस्थपक . मऔविमं, यांनी त्वरीत भसुखंडधारकास ताबा देण्याची कार्यवाही करावी आवश्यकते नुसार पोलीस व उपविभागीय अधिकारी यांची मदत घ्यावी. असे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. |
| १३ | अध्यक्ष एमआयडीसी इंडस्ट्रीज असो | अध्यक्ष डीआयए चे पत्र दि १६.२.०९ नुसार मराविवि कं ने जाने. ०९ च्या बील मध्ये दर्शविलेले अतिरिक्त भरण्याची काणेबाबत संघटनांना कळविणे बाबत | कार्यकारी अभियंता एमएसआयडीसीएल, चंद्रपूर | **सद्यस्थिती -**<br>कार्यकारी अभियंता मराविविम यांनी या बाबत लेखी स्पष्टीकरणात्मक पत्र जिउके यांना तसेच संघटनेस पाठवावे व याबाबत जिउके यांनी सुध्दा मराविविकं यांना पत्राद्वारे कळवावे. असा निर्णय झाला. अध्यक्ष औद्योगिक संघटना यांनी अशा सर्व बाधीत घटकांची यादी कार्यकारी अभियंता मराविविकं यांना पाठवावी असे ठरले. | सदर विषय कार्यसुची वरुन वगळण्यात यावा असे मा.अध्यक्षांनी निर्देश दिलेत. |
| १४ | महाराष्ट् लघु उद्योग विकास महामंडळ | शासन निर्णय दिनांक १.११.१९८५ नुसार एमईएल,वेस्टर्न कोलफिल्डसा , ऑर्डीनस फॅक्टरी , मराविविकंम, महाजेनका इ कडून नविदा सुचना ा निवीदा प्रपत्र न पुरवीण्याबाबत | | **सद्यस्थिती -**<br>जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक विभागांनी त्यांना लागणा-या सामानाची माहिती व निविदा महाराष्ट् राज्य लघु उद्योग विकास महामंडळ यांना सादर करावी. | सदर विषय कार्यसुची वरुन वगळण्यात यावा असे मा.अध्यक्षांनी निर्देश दिलेत. |
| १५ | जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर | राष्ट्रीय २००८ R & D Deffert in MSME करिता संघटनाने पात्र लघु | | सद्यस्थिती -<br>जिल्ह्याील औद्योगिक संघटनांनी सदस्यांना लेखी सुचना देवून राष्ट्रीय पुरस्कार योजनेतील पुरस्कार करिता अर्ज करण्यास प्रवृत्त | औद्योगिक संघटनांनी त्यांचे सदस्यांना सुचना दिलेल्या आहेत असे औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधींनी सांगितले. सदर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | उद्योगांना योजनेत भाग घेण्यास लावण्याबाबत | | करावे असे निर्देश दिले. | विषय विषय सूची वरुन वगळण्याचे निर्देश मा. अध्यक्षांनी दिलेत. |
| १६ | अध्यक्ष, जिल्हा औद्योगिक संघटना,चंद्रपूर | ब्रम्हपूरी आयटीआय साठी जमीन उपलब्ध करुन देणेबाबत | | नवीन विषय | District Vocationation Education Officer मार्फत सदर्हू जागा उपलब्ध करुन देणेबाबतची बाब तपासणी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्षांनी दिलेत. |

सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र,चंद्रपूर यांनी सभेतील उपस्थितांचे आभार माणून मा. अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

अध्यक्ष, जिल्हा उद्योग मित्र समिती
तथा जिल्हाधिकारी
जिल्हा उद्याग मित्र समिती सभा चंद्रपूर.

सदस्य सचिव, जिल्हा उद्योग मित्र समिती
तथा महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.